सन्मित्र

दि. ०९/०२/२०१७ रोजी आलेली माहीती.

# सिंगापोर ची शैक्षणिक सहल : ब्रीम्स च्या पीजीडीएम विद्यार्थ्यांसाठी एक वैभवशाली अनुभव

ठाणे, दि. ८ - डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनजेमेंट स्टडीज, ठाणे म्हणजेच ब्रीम्स (BRIMS) ने आपल्या PGDM अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी १८ ते २४ जानेवारी २०१७ दरम्यान सिंगापोर येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते. या संधीचा पुरेपूर उपयोग करून अशा सहलीचा एक आजीवन अनुभव घ्यावा यासाठी, विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

सहलीच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी सिंगापोर नॅशनल लायब्ररीला भेट दिली, जुन्या ग्रंथालयातील सर्व प्रमुख कारभार या नॅशनल लायब्ररी बोर्डच्या प्रमुख इमारतींत एकत्र आणून आता हे ग्रंथालय 'ली कॉंग चैन संदर्भ ग्रंथालय' म्हणुन ओळखले जाते. या संपूर्ण ग्रंथालयाला भेट देताना डॉ. आगरकर सरांसारखे उत्तम मार्गदर्शक लाभले म्हणून सर्वच विद्यार्थ्यांनी त्यांचे आभार मानले.

शुक्रवार २० जानेवारीला सकाळी सर्व विद्यार्थी Singapore Maritime Trails वर जाण्यासाठी उत्सुक होते. सागरी मार्ग सफर ही प्रसिद्धी साठीची संकल्पना असून सिंगापोर Maritime and Port Authority तर्फे त्याचे आयोजन केले जाते. Singapore Maritime Trails ही सिंगापोरच्या ऐतिहासिक कारकिर्दी पासून सुरू होऊन आजच्या सिंगापोर, एक प्रतिथयश सागरी मार्ग व्यापार आणि इतर उपक्रमांचे केंद्र म्हणून प्रस्थापित होईपर्यंतच्या कालावधीची सफर आहे. ही सफर सिंगापूर नदीच्या उगमा पासून सुरु होऊन पुढे पश्चिमेला वळून पुढे Telok Ayer क्षेत्र आणि नंतर केप्पल बंदरावरील नवीन बंदरावर संपते. ही सफर म्हणजे २.५ तासांची एक मनोहारी, निसर्ग सौंदर्याने नटलेली अशी होती.

याच दिवशी विद्यार्थ्यांनी सिंगापोर नॅशनल युनिव्हर्सिटीलाही भेट दिली तेथे त्यांना ३ तज्ञ वक्त्यांशी संवाद साधण्याची संधी मिळाली आणि त्यांच्याशी झालेल्या चर्चेतून मिळालेला अनुभव विद्यार्थ्यांसाठी खूपच मोलाचा ठरला. प्रथम श्री. दत्ता यांनी Communication and new media learning या विषयावर, नंतर समीर देशपांडे यांनी New Trends in Management या विषयावर आणि शेवटी रोहित आंबेकर यांनी १० मौल्यवान जीवन मंत्र सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

२१ जानेवारीला विद्यार्थ्यांनी जगातील सर्वोच्च तंत्रज्ञान वापरून तयार केलेल्या जलशुद्धीकरण प्रकल्पाला भेट दिली. या प्रकल्पामध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी पेय जलामध्ये रूपांतरित करण्याची क्षमता आहे. सिंगापोर मध्ये 'पाणी' मलेशिया मधून आयात केले जाते त्यामुळे तेथे पाण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब तेथे वाचवला जातो व त्या पाण्याचे पेयजलामध्ये रुपांतर केले जाते. त्यासाठी तेथे १७ जलाशये तयार केली आहेत. या प्रकल्पाचा मार्गदर्शक दौरा केल्यानंतर पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व जाणून PGDM च्या विद्यार्थ्यांनी पाणी वाचवण्याचा नियम मनापासून स्वीकारला.

२२ जानेवारीला विद्यार्थ्यांनी सेंटोसा आयलंडचा आनंद लुटला. सेंटोसा आयलंड म्हणजे एका ५०० एकर नापीक जमिनीचे आश्चर्यकारक करमणूक उद्यानात केलेले रूपांतर आहे. सोनेरी वालुकामय किनारे आणि अनेक रोमांचकारी आकर्षणांची शृंखला असलेले रिसॉर्टसचे हे एक बेट आहे. येथील सर्वात महत्त्वाचे आकर्षण असलेला, पुरस्कार प्राप्त Wings of Time हा लेसर शो पाहून या दिवसाच्या कार्यक्रमाची सांगता मनोहारी झाली.

पुढील दिवशी २३ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांनी एक सार्वजनिकरित्या अनुदानीत अशा Singapore Management University या स्वायत्त विद्यापीठाला भेट दिली. येथे विशेषत: व्यवसाय आणि व्यापस्थापन या विषयाचा अभ्यास केला जातो. SMU हे विद्यापीठ आशियातील सर्वोच्च विद्यापीठांमध्ये गणले जाते. येथील कलात्मक तंत्रज्ञान आणि उत्कृष्ट पायाभूत सुविधा यामुळे अध्ययनासाठी हे एक उत्तम स्थळ आहे. येथील International Trading Institute चे संचालक श्री. ख्रिस यांच्याशी देखील विद्यार्थ्यांनी संवाद साधला. या दरम्यान त्यांनी सिंगापोरची प्रगती आणि चीन सारख्या प्रतिस्पर्धी राष्ट्राशी तुलना संदर्भात काही ठळक मुद्दे मांडले. एखाद्या विद्यापीठ अंतर्गत स्थापन झालेली अशी ही जगातील पहिली व्यापार संस्था आहे.

सहलीच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच २४ जानेवारीला विद्यार्थ्यांनी IKEA या जगातील सर्वात मोठ्या फर्निचरच्या दुकानाला भेट दिली. विद्यार्थ्यांनी IKEA ला भेट देणे हे ब्रीम्स (BRIMS) चे संचालक डॉ. नितीन जोशी यांच्या मते महत्त्वाचे होते. या प्रत्यक्ष भेटीमुळे त्या व्यवसायाचे प्रारूप समजून घेणे विद्यार्थ्यांना शक्य झाले कारण तेथे अनेक भाग स्वयंचलित पद्धतीने एकत्र केले जात होते, स्वयंचलित पद्धतीने जोडले जात होते. विद्यार्थ्यांनी तेथील logistic विभागाला देखील भेट दिली व त्या विभागात अत्यंत सुरळीत अशा त्रुटीरहित packaging आणि dispatching प्रक्रियेचा त्यांना साक्षीदार होता आले.

शिस्तप्रिय शासन, भक्कम न्यायव्यवस्था प्रणाली असलेला हा देश सिंहाचे शहर म्हणून ओळखला जातो. वेग आणि तंत्रज्ञान सिंगापोरच्या रक्तातच भिनले आहे. ग्राहक केंद्रित दृष्टिकोन, कटाक्षाने पाळला जाणारा वक्तशीरपणा, नियोजित कार्यसंस्कृती अशा अनेक आदर्श गोष्टींची शिकवण या देशाने विद्यार्थ्यांना दिली व खूप साऱ्या उत्तम आठवणींचा खजिना विद्यार्थी सिंगापोरहून घेऊन निघाले.